Rotary
Club of Latur Mid-town

UNITE FOR GOOD

# रोटरी दिशा

## ROTARY CLUB OF LATUR MID-TOWN

ROTARY INTERNATIONAL DISTRICT 3132 | Club No.: 22604

## March - 2026

### चार्टर डे विशेषांक



**Rtn.Francesco Arezzo**
RI President 2025-26



**Rtn.Sudhir Lature**
Dist.Governor 2025-26



**Rtn.Amol Dadge**
President



**Rtn.Pawan Malpani**
Secretary



## Table of Contents


- Editorial
- Article
- Guest Editor
- Annapurna Donors
- R.I. President Message
- Upcoming Projects
- March 100% Attendance
- Photo Gallery


मुद्रक :
क्रिएटीव आर्टस अँड ग्राफीक्स
मित्र नगर, खोरी गल्ली, लातूर
9730887221, 9834827710

# संपादकीय मनोगत



प्रिय रोटेरियन बंधूंनो,

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या ''दिशा'' या मासिक बुलेटिनचा मार्च अंक आपल्या हाती देताना मला मनापासून आनंद होत आहे. प्रत्येक अंकासोबत दिशा अधिक समृद्ध, विचारपूर्ण आणि प्रेरणादायी होत आहे, ही आपल्या सर्वांसाठी अभिमानाची बाब आहे.मार्च महिना हा रोटरी वर्षाच्या दृष्टीने महत्त्वाचा टप्पा मानला जातो. वर्षभरात राबविण्यात आलेल्या विविध सेवाभावी उपक्रमांचा आढावा घेण्याची, तसेच आगामी योजनांची दिशा ठरविण्याची ही योग्य वेळ आहे. आपल्या क्लबनेही विविध सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्यविषयक उपक्रमांद्वारे समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्याचा प्रयत्न केला आहे.या अंकाच्या माध्यमातून आपण त्या सर्व उपक्रमांची झलक, अनुभव आणि प्रेरणादायी कार्यांची माहिती आपल्या सर्वांपर्यंत पोहोचवत आहोत. प्रत्येक सदस्याच्या सहभागामुळे आणि सहकार्यामुळेच हे कार्य शक्य झाले आहे, याची जाणीव आम्हाला आहे.रोटरीचे "Service Above Self" हे तत्त्व आपल्या प्रत्येक कृतीतून प्रतिबिंबित व्हावे, हीच अपेक्षा. चला तर मग, या सेवाभावी प्रवासाला अधिक बळ देत समाजासाठी अधिक कार्य करण्याचा संकल्प करूया.आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळे दिशा बुलेटिन अधिक प्रभावी होत आहे. आपले लेखन, सूचना आणि सहभाग यांचे आम्ही मनःपूर्वक स्वागत करतो.नव्या उमेदीने समाजसेवेचा प्रवास पुढे नेऊया.

आपल्या सर्वांना रोटरी चार्टर डेच्या हार्दिक शुभेच्छा!

आपला,
रो.अमोल बनाळे
संपादक,दिशा बुलेटिन
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन

### Rotary Disha Editorial Committee



Rtn.Amol Banale



Rtn.Chandrakant Gastgar



Rtn.Pramod Kumbhar



Rtn.Rohit Kulkarni

### Birthdays

Rtn.Chavan Pruthviraj– 5 Mar
Rtn. Praful Kochetta – 6 Mar
Rtn.Biyani Shravan – 9 Mar
Rtn.Ramesh Chille – 11 Mar
Rtn. Kapil Dumane – 11 Mar
Rtn. Sachin Malu - 18 Mar
Rtn. Vijaykumar Shah - 12 Mar
Rtn. Ajay Dudile - 23 Mar
Umesh Patrawale - 23 Mar
Rtn. Amol Banale - 26 Mar

### Anniversaries

Rtn. Manmath Panchakshri – 2 Mar
Rtn. Anil Patil– 8 Feb
Rtn. Rtn. Rajesh Dayama – 7 Mar
Rtn. Rtn. Bhushan Date – 10 Mar
Rtn. Vikas Barule – 12 Mar
Rtn. Laxman Done – 16 Mar



## Guest Editor Rtn.Avinash Alandkar



प्रिय रोटेरीयन बांधवांनो,
रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊन च्या ''दिशा'' या मासिक बुलेटिनचा मार्च अंक आपल्या हाती देताना मला अत्यंत आनंद आणि अभिमान वाटत आहे. अतिथी संपादक तथा प्रेसिडेंट इलेक्ट (रोटरी वर्ष २०२६-२७) या नात्याने या विशेष अंकातून आपल्याशी संवाद साधण्याची संधी मिळणे, ही माझ्यासाठी एक सन्मानाची बाब आहे.या महिन्याचा अंक आपण ''रोटरी चार्टर डे विशेषांक'' म्हणून प्रकाशित करत आहोत. आपल्या क्लबच्या स्थापनेचा हा दिवस केवळ उत्सवाचा क्षण नसून, आपल्या एकत्रित प्रवासाचे स्मरण करण्याचा, भूतकाळातील यशस्वी वाटचालीचा गौरव करण्याचा आणि भविष्यातील नव्या संकल्पांची दिशा ठरविण्याचा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनने स्थापनेपासून आजपर्यंत समाजहितासाठी अनेक उपक्रम राबविले आहेत. शिक्षण, आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, महिला सक्षमीकरण आणि युवक विकास अशा विविध क्षेत्रांमध्ये आपल्या क्लबने उल्लेखनीय कार्य केले आहे. या सर्व उपक्रमांच्या यशामागे प्रत्येक सदस्याची निष्ठा, समर्पण आणि सेवाभाव यांचा मोठा वाटा आहे.चार्टर डे हा आपल्या मूल्यांची पुनःप्रत्ययाची वेळ आहे.
"Service Above Self" या रोटरीच्या मूलमंत्राने प्रेरित होऊन आपण समाजासाठी कार्य करत आलो आहोत आणि पुढेही अधिक प्रभावीपणे कार्य करण्याचा संकल्प या निमित्ताने दृढ करूया. बदलत्या काळानुसार नव्या कल्पना, आधुनिक दृष्टिकोन आणि सामूहिक प्रयत्न यांच्या जोरावर आपण समाजात अधिक व्यापक आणि दीर्घकालीन परिणाम घडवू शकतो.या विशेषांकाच्या माध्यमातून आपल्या क्लबच्या प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पे, उपक्रमांची झलक आणि सदस्यांच्या अनुभवांचे संकलन सादर करण्याचा प्रयत्न केला आहे. हा अंक केवळ माहितीपर न राहता, प्रत्येक रोटेरियनसाठी प्रेरणादायी ठरेल, अशी अपेक्षा आहे.चला तर, रोटरीच्या या गौरवशाली परंपरेला अधिक बळ देत, एकजुटीने आणि नव्या उमेदीने समाजसेवेचा प्रवास पुढे नेऊया.
आपल्या सर्वांना रोटरी चार्टर डेच्या हार्दिक शुभेच्छा!

**रो. रमेश चिल्ले**
**अतिथी संपादक - दिशा बुलेटीन**

## Message from R.I. President



President Francesco's March 2026 Newsletter, he talks about how water connects us all, and when local Rotary water service projects are connected, measured, and shared, they become a force that extends beyond geography and borders. He also talks about the impact of Rotary's partnership with the United Nations Environment Program through the Community action for Fresh Water initiative. As we observe Water, Sanitation, and Hygiene Month, Francesco encourages you to reflect on the freshwater systems that sustain your community and the role Rotary can play in protecting them.. He says, "When we connect local action to global vision, we strengthen Rotary's ability to make lasting change".:........The Reach of Community ActionWater connects us all. From a river in a remote forest to a stream running past a city neighbourhood, freshwater ecosystems sustain humanity. Yet these waters are increasingly under strain.Pollution, overuse, and climate pressures remind us that protecting freshwater is a global challenge.Rotary has always believed change begins within communities. Now we are working to see how far the impact of community action can travel. When local service is connected, measured, and shared, it becomes a force that extends beyond geography and borders. A water project led by the Rotary Club of Panama Nordeste exemplifies this idea. The project served indigenous communities in Panama's Darien province, a region accessible only by canoe and small boat. With no roads, limited electricity, and reliance on untreated river water, families faced serious health risks. To reach these communities, Rotarians had to rethink how supplies and services could be delivered. Working with a partner club in the United States and a specialized water organization, they introduced solar-powered water treatment systems for an area without access to an electric grid. local leaders were trained to operate and maintain the system, ensuring that clean water would continue flowing long after installation crews departed. The results were immediate. Children who once missed school due to illness, returned to classrooms. No longer needing to haul water from rivers, adults gained time and strength to work and support their families. What began as a water project became a foundation for healthier, more resilient communities. This is how we extend our reach: combined local leadership with global partnerships, technical expertise, and long-term thinking.That same spirit is at the heart of Rotary's partnership with the United Nations Environment Program through the Community action for Fresh Water initiative. Around the world, Rotary and Rotaract clubs are restoring waterways, protecting wetlands, and safeguarding vital freshwater resources. By collecting data to map and measure this work, we can better understand its impact and show how local service contributes to worldwide solutions.Data is not an end. It is a tool that helps us learn and improve so that Rotary's service delivers real, measurable change. each project entered and each waterway restored adds to a shared story of stewardship and responsibility. You can learn more and get involved at communityactionforfreshwater.org .As we observe Water, Sanitation, and Hygiene Month, I encourage you to reflect on the freshwater systems that sustain your community and the role Rotary can play in protecting them.When we connect local action to global vision, we strengthen Rotary's ability to make lasting change. Together, by extending our reach and working side by side, we truly Unite for Good.

**Francesco Arezzo**
**R.I. President**

## Secretary Report

- राष्ट्रगीताने मिटींग ची सुरुवात झाली.
- फोरवे टेस्ट चे वाचन सामुहिकरीत्या झाले.
- अध्यक्षांनी सर्वांचे शब्द सुमनांनी स्वागत केले.
- साप्ताहिक पत्रव्यवहार अध्यक्षांनी सादर केला
- मागील मिटींग क्र. ३५ चे वाचन सचिव पवन मालपानी यांनी केले..
- डिजी इलेक्शन नोटीफीकेशन बाबत माहिती दिली.
- डिस्ट्रीक्ट कडून झुम मिटींग घेण्यात आली यात सर्व क्लब चे अध्यक्ष, सचिव उपस्थित होते. या मिटींग मध्ये टिआरएफ , मेम्बरशीप व ग्लोबल ग्रँट या विषयावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले असे अध्यक्षांनी सांगितले.
- आगामी काळातील प्रोजेक्ट विषयी माहिती रो.मोतीलाल वर्मा यांनी दिली. ग्लोबल ग्रँट अंतर्गत लातूर वृक्ष टिम ला दोन टँकर देण्याचे नियोजन आहे असे सांगितले.
- चार्टर डे २९ मार्च रोजी घेणार असल्याचे रो. संतोष गांधी यांनी सांगितले व प्रोजेक्ट चेअरमन म्हणून रो. उमेश पत्रावळे यांची निवड करण्यात आली.
- ट्रॅफीक अवेअरनेस कॅम्प बद्दल माहिती रो. सागर बोरा यांनी दिली. या प्रोजेक्ट मध्ये रो. रमेश चिल्ले, उमेश पत्रवळे, अमोल बनाळे, विशाल अयाचित, रो. श्रीनिवास भंडे हे काम पाहतील.
- आरोग्य तपासणी अंतर्गत दावकपुर येथे ७० लोकांची डोळे तपासणी करण्यात आली व त्यांतील ८ जणांचे मोतीबिंदु चे ऑपरेशन शंकरशेठ साबळे हॉस्पिटल सोलापूर येथे करण्यात आले.
- डिजी ऑफीस मधुन आलेल्या नोटीफीकेशन चे विवरण अध्यक्षांनी दिले व रो. लितेश शाह यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.
- क्लब बुलेटिन : साप्ताहिक रोटरी दिशा चे अनावरण माजी अध्यक्ष यांच्या हस्ते करण्यात आले. अतिथी संपादक म्हणून रो. सागर बोरा यांनी कार्य केले.
- फेलोशिप अनाउन्समेंट रो. विशाल अयाचित यांनी केली.

**Man of The Meeting**



Rtn.Rajaram Dawanka

**1st Come in the Hall**



Rtn. Vishnudas Toshniwal




**Annapurna Donors this month**

CA Radhesham ji Biyani - 7500/-
Sonal Hingane - 2500/-
Chavhan Family - 3100/-
Dattatray Mane - 2500/-
RTN. Adv.Dr. Vijaykumar Birajdar -10,000/-
Dr. Satish Malpani- 2500/-
Shrikant Gilda - 2500/-

सर्वांचे मनापासून धन्यवाद

# रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाउनचे ४० वर्षांचे सिंहावलोकन

समाजात सेवाभाव जोपासणाऱ्या विविध क्षेत्रातील व वयोगटातील व्यक्ती एकत्र येऊन मैत्री भावनेतून स्वखर्चाने जगभरात सव्वा कोटी रोटरीयन समाजकार्य करतात हे रोटरीचे वैशिष्ट्य होय . रोटरी ही १२१ वर्ष जुनी आंतरराष्ट्रीय सेवाभावी संघटना असून ती जगातील सर्वात जास्त सदस्य असलेली ऑर्गनायझेशन आहे. जगातील २२१ देशात ४६००० एवढ्या क्लबच्या माध्यमातून एक कोटी वीस लाख सदस्य संख्या असलेली ही संघटना आहे. तिचा कारभार अत्यंत पारदर्शकपणे चालतो .आंतरराष्ट्रीय पातळीपासून ते क्लब पातळीपर्यंत दरवर्षी एक जुलैला नवीन  पदाधिकाऱ्याकडे तिची सूत्रे सहजपणे सोपवली जातात .यात कुठलेच राजकारण व भेदभाव याला थारा नाही. महिला व पुरुष सदस्य यातही कुठलाच दुजाभाव केला जात नाही. प्रत्येक जण स्वतःच्या आवडीतून या'ध्ये सहभागी होतो ही, रोटरीची खाशीयत आहे.

रोटरी मुख्यत्वे शिक्षण ,आरोग्य ,पर्यावरण, स्वच्छता, पाणी  यांच्या माध्यमातून शेतकरी व गोरगरिबांच्या जीवनात चांगले दिवस यावेत म्हणून कार्यरत असते.

रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटावूनला मागील ४० वर्षाची उज्वल अशी परंपरा आहे .रोटरी क्लब लातूरने १९८४ ला डॉक्टर मधुकरराव कुलकर्णी (जी एस आर) यांनी आपल्या क्लबला स्पॉन्सर केले ..क्लबचे पहिले अध्यक्ष होण्याचा मान  रोटरीन गुप्ता सर यांना तर सचिव होते ॲड. उमेश कुलकर्णी. तेव्हाच्या चार्टर्ड मेंबर मधील डॉक्टर सोपानराव जटाळ व विष्णूभाऊ तोष्णीवाल हे अजूनही आपल्या क्लबचे सदस्य आहेत ही जमेची बाजू आहे. क्लब मध्ये सध्या नसलेले पण चार्टर्ड मेंबर असलेले दिलीप सौताडेकर, बंडोपंत तांदळे, ज्ञानोबा गंदीमे ,अशोक कोटलवार, दीपक राठी ,चंद्रभानू परांडेकर ,ॲड. कालिदासराव देशपांडे व डॉक्टर नंदकुमार धर्माधिकारी हे सध्या हयात आहेत.

क्लब स्थापन झाला तेव्हा क्लब ची मीटिंग दर आठवड्याच्या सोमवारी भरत व त्यात फेलोशिप वगैरेचा प्रघात नव्हता .पुढे अध्यक्ष डॉक्टर ईश्वर राठोड यांनी स्वतःचे घरून जेवण आणून सर्व सदस्यांना ते देत. मग दर आठवड्याला वेगवेगळे सदस्य जेवण देऊ लागले. सन १९९१ ला विष्णू भाऊ तोष्णीवाल अध्यक्ष असताना सो'वार ऐवजी शनिवारी 'िटींगला सुरुवात झालेली.ती आजतागायत चालू आहे. सुरुवातीच्या मिटिंग हनुमान चौकातील नवयुग वाचनालयात भरत. तेव्हा १८ ते २० सदस्यांनी सुरुवात झालेल्या क्लबची पुढे ३०, ४०, ५०, ६० असी संख्या वाढत वाढत आज १४० च्या पुढे आपली सदस्य संख्या झालेली आहे . पुढे काही कालावधीनंतर क्लबच्या मीटिंगभालचंद्र ब्लड बँकेतील सभागृहात होऊ लागल्या.

रोटरी इंटरनॅशनल ने परवानगी दिल्यानंतर हॉटेलमध्येही मीटिंग होऊ लागल्या. तर काही शनिवारी व काही रविवारी अशाही आपल्या मीटिंग होत असत .अध्यक्ष शशिकांत मोरलवार यांचे कोविडमधिल कार्यकाळात  सर्व डिस्ट्रिक्ट मध्ये पहिल्यांदा आपल्या क्लबने ऑनलाईन मीटिंगला सुरुवात केलेली. त्यात वेगवेगळ्या ३० ते ३२ देशाबरोबर आपल्या मीटिंग ऑनलाईन होऊ लागल्या ,तर देशातील २० ते २५ क्लब बरोबरही मीटिंग घेण्याचा बहुमान आपल्या क्लबकडेच जातो.

रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटाउनने १९९० -९१ मध्ये पहिल्यांदा रोटरॅक्ट क्लब स्पॉन्सर केला .तर २००४- ०५ पासून दरवर्षी सात ते आठ इंटरॅक्ट क्लब ची स्थापना करण्यात येते.महिलांचा सॅटलाईट क्लब चालू वर्षीपासून कार्यरत आहे .हा बदल घडायला चाळीस वर्षे लागले.

लातूर जिल्ह्यातून आजपर्यंतच्या काळात पाच डिस्ट्रिक्ट गव्हर्नर झालेले असून त्यात पी डी जी विजय भाऊ राठी ,डॉ. शिवदास भोसले ( हयात नाहीत )डॉ. हरिप्रसाद सोमाणी ,ओमप्रकाश मोतीपवळे व सध्याचे प्रंतपाल आपल्या रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटावूनचे सुधीर लातूरे हे होत. आतापर्यंत आपल्या क्लबने अनेक बेस्ट प्रेसिडेंट, बेस्ट सचिव ,बेस्ट सहाय्यक प्रांतपाल व बेस्ट डायरेक्टरचे अवॉर्ड मिळवलेले आहेत. जवळपास सर्वच एवेन्यू मध्ये आज पर्यंत डिस्ट्रिक्ट कडून अनेक वेळा पहिल्या ट्रॉप्या मिळवलेल्या आहेत.

क्लबचे ४० वर्षातील महत्त्वपूर्ण प्रोजेक्टः  मॅचिंग ग्रँडमार्फत केशवराज विद्यालयात बोअर पाडून दिला .कॅन्सर डिटेक्शन व्हॅन, ''रोटरी आशा एक्सप्रेस'', रोटरी क्लब ऑफ  होरायझन  सोबत सध्या कार्यरत आहे .तर हराळी तालुका लोहारा येथील कृषी अवजारे बँक ही सध्या चर्चेचा विषय आहे.

वर्ल्ड कम्युनिटी सर्विसेस ( डब्लू सी एस): मधून एकूण १८ शाळांना वॉटर कुलर व वॉटर फिल्टर .दोन शाळांना लोखंडी बाकडे देण्यात आले.

डिस्ट्रिक्ट ग्रँड मधून गोलाई मधील  व गांधी चौकातील देवी मंदिरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था. पोलीस स्टेशन शिवाजीनगरला पाण्याची टाकी व फिल्टर बसवून देण्यात आले.

केशवराज मंदिर लातूर व शांतीवन स्मशानभूमी निलंगा येथे शीतशेवरपेटी आपल्या क्लब मार्फत देण्यात आली .

ई लर्निंग क्लासरूम व प्रोजेक्टर असे चार शाळांना देण्यात आले .

तिरुपती बालाजी येथील स्टेशनवर रायटिंग टेबल असे क्लबच्या माध्यमातून देण्यात आले.

सी एस आर फंडातून ग्रामीण भागातील शाळांच्या वाचनालयास दहा कपाट व पुस्तके देण्यात आली . विविध शाळातील होतकरू व हुशार मुलींना दहा सायकलीचे वाटप.

डीजीई जयेश पटेल यांचे मार्फत दोन शाळांना रंगीत टेलिव्हिजन देण्यात आले.

क्लबच्या माध्यमातून ममता हॉस्पिटल सोबत मुतखडा तपासणी व ऑपरेशन कॅम्प .लहाने हॉस्पिटल सोबत प्लास्टिक सर्जरी कॅम्प .जटाळ हॉस्पिटल सोबत नस जोडणी ऑपरेशन्स .तसेच शहरातील मध्यवर्ती ठिकाणी बिल्ड एक्सपो दोन वेळेस घेण्यात आले त्याला मोठा प्रतिसाद मिळाला.

दरवर्षी रक्तदान शिबिराच्या माध्यमातून समाजातील गरजू रुग्णांना हजारो बाटल्या रक्त संकलित करून ब्लड बँकेमार्फत वाटप करण्यात येते. १४७० बाटल्या रक्त ,एका रक्तदान शिबिरामध्ये गोळा करण्याचा विक्रमही आपल्या क्लबचाच .

लातूर रोटरी परिवाराच्यावतीने व रत्ननिधी चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून ५०० च्या वर गरजू अपंगांना अवयवांचे मोफत वाटप. तसेच शंकर शेठ साबळे हॉस्पिटल, एच व्ही देसाई फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ  लातूर मिडटावून च्या सहकार्याने मोतीबिंदू शस्त्रक्रिया ४५० तर कॅन्सर डिटेक्शन कॅम्प तीन झाले असून दीडशे महिलांची तपासणी करण्यात आली आहे.

रोटरी युथ एक्सचेंज मार्फत राज उमाकांत मद्रेवार  हा युवक तैवानला २०२५ -२६ मध्ये १५ दिवसांसाठी जाऊन आला .तर आपल्या क्लब मेंबरनेही जी एस ई अंतर्गत वेगळ्या देशातील युवकांना अनेक वेळा होस्ट केलेले. आपल्या क्लबची ट्रस्ट असून ती गेल्या वीस वर्षापासून कार्यरत आहे. क्लब कडे एक भूखंड सुद्धा असून ती क्लबची जमेची बाजू आहे.

आपल्या क्लब ने आतापर्यंत मुरुड ,उदगीर ,रेणापुर, देगलूर ,निलंगा व धर्माबाद येथे क्लब स्पॉन्सर केलेले. सध्या चालू असलेल्या क्लबच्या महत्त्वाच्या प्रोजेक्टमध्ये ''रोटरी अन्नपूर्णा योजना ''२०१९ -२० पासून आजतागायत ५० प्लस निराधार व वृद्ध व्यक्तींना दोन वेळचे जेवण दिले जाते .कोविड काळातही हा प्रोजेक्ट बंद झालेला नाही हे विशेष होय .गेल्या ३१ वर्षापासून रोटरी मिडटाउनने चित्रकला स्पर्धा घेऊन एक वेगळाच कीतिमान स्थापन केला आहे. चित्रकलेतील अनेक गुणवंत विद्यार्थी देशात व जगभरात गाजत आहेत व त्यांची चित्रे आंतरराष्ट्रीय मॅक्झिन मधून प्रकाशित झाली आहेत. या प्रोजेक्टच्या माध्यमातून दरवर्षी १२ सायकली प्रथ' येणाऱ्या स्पर्धकांना दिल्या जातात. ही काही मोजकी प्रोजेक्ट आपल्यासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला.एक नाही असे अनेक महत्त्वाचे प्रोजेक्ट आपल्या क्लब ने घेऊन जनते'ध्ये रोटरीची प्रति'ा उंचावण्याचे काम केले असल्याने, सर्वसामान्यांचा रोटरी बद्दलचा सकारात्मक दृष्टिकोन बळावण्यात साह्य झाले आहे.

प्रेसिडेंट इलेक्ट. - रमेश चिल्ले

# Rotary Memories


















# Rotary Memories














## 100% Attendence - February Month



1. Shradhhanand APSHETTI
2. Amol Banale
3. Prashant Bhatgave
4. Amol Dadge
5. Pramod Kumbhar
6. Govind Kunchamwar
7. Pawan Malpani
8. Chetan Pandharikar
9. Dr.Rajgopal Tapdiya
10. Kapil Dumane
11. Motilal Varma
12. Ramesh Chille
13. Vishnudas ji Toshniwal
14. Santosh Gandhi
15. Dr.S.D. Kulkarni
16. Anil Patil
17. Litesh Shah

## Photo Gallery









MERINO LAMINATES
BE DIFFERENT
MARINE BOARD
*Pawan Malpani*

# Shri Balaji Ply-Lam

Near Ratnadeep Talkies, Latur - 413 512
Mob. : 9422877465 Email - psmalpani@gmail.com